**महाराष्ट्र शासन**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
**डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.**

दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२
ई-मेल depmah2@gmail.com

जा.क्र./प्राशिसं/प्र.प्र/आरटीई-५२०/२०२३/3625
दिनांक : ०८/०५/२०२३.

08 MAY 2023

प्रति,

१) शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई, म.न.पा.
२) शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व,
४) प्रशासन अधिकारी म.न.पा./न.पा. सर्व.

**विषय :- सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकाकरिता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत निवड यादीतील प्रवेश पात्र बालकांच्या प्रवेशाकरीता अंतिम मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ :- १) संचालनालयाचे पत्र जा.क्र./प्राशिसं/प्र.प्र.सु.सू/आरटीई-५२०/२०२३/१७२५ दिनांक २८/०२/२०२३.**
**२) संचालनालयाचे पत्र जा.क्र./प्राशिसं/प्र.प्र./आरटीई-५२०/२०२३/३१११ दिनांक १३/०४/२०२३.**
**३) संचालनालयाचे पत्र जा.क्र./प्राशिसं/प्र.प्र./आरटीई-५२०/२०२३/३३१२ दिनांक २४/०४/२०२३.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रीया संपुर्ण राज्यात ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिये अंतर्गत ऑनलाईन सोडत (लॉटरी) बुधवार दिनांक ०५/०४/२०२३ रोजी काढण्यात आली असून निवड यादीतील बालकांचे प्रवेश मुदत दिनांक १३/०४/२०२३ ते ०८/०५/२०२३ पर्यंत आहे.

**सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिये अंतर्गत ऑनलाईन सोडतीद्वारे निवड झालेल्या निवड यादीतील बालकांच्या कागदपत्रांची तपासणी करुन प्रवेश निश्चित करण्यासाठी व बालकांच्या पालकांना प्रवेशासाठी दिनांक १५/०५/२०२३ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.**

तरी आपल्यास्तरावर प्रलंबित असलेल्या प्रवेशाबाबतच्या तक्रारी व अपील अर्जांबाबत सुनावणी घेवून दिनांक १५/०५/२०२३ पूर्वी निकाली काढण्यात यावीत.

तद्नंतर सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिये अंतर्गत ऑनलाईन सोडतीद्वारे निवड झालेल्या प्रतिक्षा यादीतील बालकांच्या प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. तरी याबाबत आपल्यास्तरावरुन मोफत प्रसिध्दी देण्यात यावी.

**(शरद गोसावी)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
शिक्षण संचालनालय, पुणे - १.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**
१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**
मा. तांत्रिक सल्लागार, एन.आय.सी. पुणे.



Scanned by CamScanner